# भारत अफगाणिस्तान संबंध काल व आज

**प्रा. ए. बी. राऊत**
*कर्मवीर आबासाहेब तथा ना. म. सोनवणे महाविद्यालय*
*सटाणा, जि नाशिक*

अफगाणिस्तान आणि भारत यांचे पुरातन काळापासून संबंध असलेले दिसून येतात महाभारतामध्ये धृतराष्ट्राची पत्नी म्हणजेच कौरवांची आई गांधारी ही सध्याच्या अफगाणिस्तानी कंधार येथील असल्याचे म्हटले जाते.तालिबान या संघटनेची स्थापना अमेरिका व पाकिस्तानाच्या पुढाकाराने झाली रशियाला अफगाणिस्तानातून बाहेर काढण्यासाठी अफगाणिस्तानातील पश्तू पठाण सोविएत रशियाच्या कम्युनिस्ट राजवटी विरोध करण्यासाठी स्थापन केली. तालिबान या पश्तू भाषेतील शब्दाचा अर्थ विद्यार्थ्यांची संघटना असा होतो. 1995 मध्ये तालिबानने इराणच्या सीमेलगत असलेल्या हेरात वरती कब्जा केला आणि 1996 मध्ये त्याने कंधार वर आपले नियंत्रण मिळवले राष्ट्रपती बुरहानुद्दिन रब्बनी या राष्ट्रपतींना पदच्युत केले 1998 पर्यंत यांनी 90 टक्के अफगाणिस्थान वर कब्जा मिळविला. सुरुवातीला तालिबान फक्त अफगाणिस्तान पुरताच मर्यादित होता. अफगाणिस्तानातील रशियाची राजवट संपल्यानंतर त्यांनी अफगाणिस्तानमध्ये शरीयत नुसार राजवट स्थापन केली. मुलींनच्या शिक्षणावर व स्वातंत्र्यावर अनेक बंधने आणली. त्यांना एकट्याने फिरण्यास मर्यादा घातल्या. त्याचबरोबर इतर धर्म आणि लोकांचे अस्तित्व मान्य करण्यास सुरुवात केली. महिलांना बुरखा अनिवार्य केला. बाहोमी लो येथील बुद्धांच्या मूर्ती पाडल्या एकंदरच शरीयत नुसार कारभार करून इतर धर्मियांना आपले शत्रू मांडण्यास सुरुवात केली टीव्ही संगीत याच्यावर ती बंधने आणली.

जगातील अनेक मुस्लिम दहशतवादी संघटनांना मदत करण्यास सुरुवात केली. त्यांच्या या गोष्टीचा फायदा पाकिस्तानने भारताविरुद्ध करून घेण्यास सुरुवात केली होती. त्यांनी भारतातील अनेक दहशतवादी संघटनानी तालिबान संबंध जोडण्यात पाकिस्तानच्या मदतीने सुरुवात केली. ज्या ज्या ठिकाणी मुस्लीम राजवट आहे त्या त्या ठिकाणी सुरुवातीच्या काळामध्ये पाठिंबा द्यायला सुरुवात केली होती यातूनच भारतातील काश्मीरमध्ये आतंकवादी कारवाया वाढवण्यास कारणीभूत सुद्धा ठरलेले होते या काळात भारत सरकारने तालिबान सी म्हणजेच अफगाणिस्थान अशी संबंध पूर्णपणे नाकारले कोणताही व्यवहार त्यांनी त्या काळातील तालिबानी अफगाणिस्तान बरोबर केला नाही.

**तालिबानी अफगाणिस्तान व भारत यांच्यातील संबंध**

**कंधार विमान अपहरण**

1999 मध्ये भारताचे एक प्रवासी विमान नेपाळमध्ये हायजॅक करण्यात आले व विमान कंधारला नेण्यात आले. त्या वेळी तिथे पहिल्यांदा अस्तित्वात आलेली तालिबानी राजवट होती. त्यावेळी तत्कालीन तालिबान्यांनी भारत सरकार व अपहरणकर्ते यांच्यामध्ये मध्यस्थीची भूमिका केली. तालिबान्यांनी दहशतवाद्यां यांना सांगितले की आमच्या भूमीवर कोणताही रक्तपात होता कामा नये. पण त्याचबरोबर भारत सरकारला ही आमच्या भूमीवर कोणतीही कारवाई करू देणार नाही अशी भूमिका घेत घेतली. दहशतवाद्यांनी सुरुवातीला वीस अतिरेक्यांना सोडण्याची व पैशाची मागणी केली नंतर मात्र तालिबान्यांच्या मध्यस्थी नेत्यांनी दहशतवाद्यांनी सोडण्याची मागणी केली. खूंखार आतंकवादी मौलाना असद अफझल आणि इतर दहशतवाद्यांना सोडविण्यात आले यावेळेस तालिबान्यांनी फारशी भारताच्या बाजूने व विरोधी अशी कोणतीही भूमिका घेतली नाही. परंतु याच काळात त्यांनी काश्मीरमधील दहशतवादाला काही प्रमाणात का होईना मदत केलेली दिसून येते.

वर्ल्ड ट्रेड सेंटरवर आतंकवादी हल्ला केल्यानंतर अलकायदाचा प्रमुख ओसामा बिन लादेन यांनी अफगाणिस्तानमध्ये आश्रय घेतला. तालिबान्यांनी लादेनला अमेरिकेच्या ताब्यात देण्यास नकार दिला. त्यामुळे अमेरिकेने अफगाणिस्तानवर हल्ला करण्याची योजना आखली. त्यामुळे अनेक तालीबानी नेते अफगाणिस्तान सोडून पळून पाकिस्तानमध्ये व इतरत्र पळून गेले.नंतर अमेरिकेने पाकिस्तानमधील लपून बसलेल्या लादेनला ठार केले. पण तालिबान्यांनी आपली प्रसार हा छोट्या मार्गाने चालू ठेवला अफगाणिस्तानच्या सरकार तालिबान्यांचा पूर्णपणे बिमोड करू शकले नाही.

त्यातच अमेरिकन लष्कराचा व अमेरिकेचा अफगाणिस्तान मोठ्या प्रमाणात खर्च होऊ लागला. त्यामुळे अमेरिकेने अफगाणिस्तानमधून माघार घेतली अफगाणिस्तानमध्ये तालिबानी मुस्लीम राजवट चालू केल्यामुळे सहाजिकच अमेरिकेने अफगाणिस्तानमध्ये ताबा मिळवल्यानंतर त्या ठिकाणी लोकशाही पद्धतीने हमीद करजाई यांचे सरकार स्थापन केले या सरकारने दहशतवादाला व हिंसाचार ला विरोध करून आधुनिकतेची लोकशाही पद्धतीचा स्वीकार केला त्यामुळे भारताने अफगाणिस्तान बरोबर मैत्रीपूर्ण संबंध हे प्रस्थापित केले यातून भारताने मुख्यतः अफगाणिस्तानमध्ये पायाभूत सुविधांना प्राधान्य दिले 2001 मध्ये तालिबानची राजवट संपल्यानंतर भारताने अफगाणिस्तान बरोबर नव्याने संबंध प्रस्थापित करत तीन अब्ज डॉलरची गुंतवणूक केली अफगाणिस्तानमध्ये रस्ते धरणे शाळा रुग्णालय इत्यादी महत्त्वपूर्ण बांधकामाची उभारणी केली ठाणे अफगाणिस्तान मध्ये अनेक मोठमोठी विकास प्रकल्पाचे बांधकाम केले आहे व त्या ठिकाणी स्वताचा पैसा गुंतवला आहे.

**भारताने अफगाणिस्तानमध्ये खालील प्रकल्पात गुंतवणूक केली आहे**

**सलमा धरण –**

सलमा धरण हे भारत-अफगाणिस्तान मैत्रीचे प्रतिक म्हणून ओळखले जाते. अफगाणिस्तानातील हेरात प्रांतात उभारलेले सलमा धरण हे एक जलविद्युत योजना आहे. या धरणाची निर्मिती २०१६ मध्ये भारताकडून पूर्ण करण्यात आली. भारत-अफगाणिस्तानमधील दृढसंबंध दाखवण्यासाठी देखील या प्रोजेक्टचा उल्लेख केला गेला आहे. या धरणाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले होते. या धरणाच्या निर्मितीसाठी भारताने २७.५ कोटी डॉलरची गुंतवणूक केली आहे. अफगाणिस्तानमधील सर्वात मोठ्या धरणांपैकी एक अशी याची ओळख आहे. या धरणातून हेरात प्रांतात हजारो कुटुंबांना पाणी आणि वीज पुरवठा केला जातो.

**जरांज-डेलाराम महामार्ग –**

भारताने अफगाणिस्तानमध्ये उभारलेला दुसरा हाय-प्रोफाईल प्रकल्प म्हणजे बॉर्डर रोड आर्गनायझेशनने बांधलेला २१८ किमी लांबीचा जरांज-डेलाराम महामार्ग. हा महामार्ग अफगाणिस्तान-इराण बॉर्डर परिसरात आहे. याला खाश रुद नदी-डेलाराम-जरांज महामार्ग म्हणून ओळखले जाते. या महामार्गाची निर्मिती ३०० भारतीय इंजिनिअर्स आणि मजुरांनी एकत्र केली होती. या महामार्गामुळे भारताचा अफगाणिस्तानशी संपर्क सोपा झाला होता. यामुळे पाकिस्तानची आवश्यकता यात राहिली नव्हती. भारताने इराणच्या चाबहार बंदराद्वारे, जरांज-डेलाराम महामार्गाद्वारे ७५ हजार टन गहू अफगाणिस्तानला निर्यात केला होता. या महामार्गाचे उद्घाटन अफगाणिस्तानातील माजी राष्ट्रपती हमीद करझाई आणि माजी परराष्ट्र मंत्री प्रणव मुखर्जी यांनी केले होते.

**अफगाणिस्तान संसद भवन –**

२०१५ मध्ये भारताने अफगाणिस्तानची संसद भवनाची उभारणी केली. या संसद भवनाच्या निर्मितीसाठी ९ कोटी डॉलरचा खर्च झाला होता. अफगाण संसद भवनातील एका ब्लॉकला नाव माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचे नाव देण्यात आले आहे. हे संसद भवन अफगाणिस्तानात भारतीय लोकशाहीच्या विजयाचे प्रतिक बघितले जाते.

**स्टोअर महल –**

अफगाणिस्तानातील या ऐतिहासिक महालाची पुनर्निर्मिती २०१६ मध्ये भारताने केली होती. या महालात १९१९ मध्ये ऐतिहासिक रावलपिंडी करार झाला होता. त्यानंतर अफगाणिस्तानला स्वातंत्र्य मिळाले होते. १९६५ पर्यत अफगाण सरकारचे परराष्ट्र मंत्रालय याच महालात होते. मात्र त्यानंतर भारताच्या आगा खान ट्रस्टने भारत आणि अफगाणिस्तान सरकारबरोबर केलेल्या करारानंतर याची पुर्ननिर्मिती करण्यात आली होती. या नवीन महालाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अफगाणिस्तानचे राष्ट्राध्यक्ष अशरफ गनी यांनी केले होते.

**आरोग्य सेवा प्रकल्प –**

भारताने बदाखशान, बल्ख, कंधार, खोस्त, कुनार, नंगरहार, निमरुझ, नूरिस्तान, पक्टिया आणि पक्तिका या सीमावर्ती प्रांतात अनेक आरोग्यसेवा केंद्रे बांधली आहेत. भारताने १९७१ मध्ये बनवलेल्या 'इंदिरा गांधी इन्स्टिट्युट फॉर चाइल्ड हेल्थ' हे हॉस्पिटलला १९९६ मध्ये तालिबान्यांची सत्ता आल्यानंतर पाडण्यात आले होते. मात्र पुन्हा २००१ मध्ये तालिबान्यांच्या हातातून सत्ता गेल्यानंतर त्या हॉस्पिटलला पुन्हा बांधण्यात आले होते. २००७ मध्ये त्याचे बांधकाम पूर्ण झाले होते. काबूलमधील हे हॉस्पिटल लहान मुलांसाठीचे अफगाणिस्तानातील सर्वात मोठे हॉस्पिटल आहे. त्याशिवाय 'इंडियन मेडिकल

मिशन' द्वारे या भागात मोफत सल्ला शिबिरेही आयोजित केली जातात.

**वीज निर्मिती आणि प्रसारण प्रकल्प –**

भारताने बागलाण प्रांताची राजधानी पुल-ए-खुमरी येथून 220kV DC वीज निर्मिती प्रकल्पाची उभारणी केली आहे. या प्रकल्पातून राष्ट्रीय राजधानी काबूलला वीज पुरवठा केला जातो. त्यासोबतच भारताने अफगाणिस्तानातील अनेक प्रांतांमध्ये दूरसंचार प्रकल्प आणि पायाभूत सुविधा पुर्नरचना केली आहे.

**तालिबानी राजवटीचे भारतावर होणारे परिणाम**

तालिबानची राजवट अफगाणिस्तानमध्ये स्थापन झाल्यानंतर त्याचा फायदा सहाजिकच पाकिस्तान घेण्याचे नाकारता येणार नाही. पाकिस्तान चीन हे अफगाणिस्थान मध्ये जास्तीत जास्त शिरकाव करून भारताची वेगळ्या मार्गाने कोंडी करण्याचा प्रयत्न करतील. भारताने अफगाणिस्तान मध्ये चालू केलेली वीज प्रकल्प राबविला योजना या नष्ट करून भारताचे अफगाणिस्तानमधील अस्तित्व कमी करण्याचा प्रयत्न या दोन्ही देशांकडून केला जाण्याची शक्यता आहे. काश्मीरबाबत भारताच्या दृष्टीने डोकेदुखी वाढण्याची शक्यता आहे. कारण पाकिस्तान हा तालिबान्यांना काश्मीरमधील दहशतवादासाठी खतपाणी घालण्याचा प्रयत्न करू शकतो. भारतामध्ये ज्या काही देश विरोधी विघातक घातक शक्ती आहेत. त्यांनासुद्धा यामुळे पाठबळ मिळू शकते भारताने 370 कलम रद्द करून एकंदरच काश्मीरमध्ये शांतता निर्माण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न अधिक केलेले दिसून येतात. एकंदरच मध्ये भारताला यश येताना दिसून येत आह अशा वेळेस पाकिस्तान तालिबानी दहशतवाद्यांना भडकावून काश्मीरमधील मुस्लिमांच्या स्वातंत्र्याचा मुद्दा प्रोत्साहन देऊन दहशतवादी कारवाया वाढीस लावू शकतो.

**उपाय योजना**

तालिबानशी 1996 ते २००१ या काळात चर्चा न करणे शक्य होते कारण त्या काळातील जागतिक परिस्थिती ही वेगळी होती. पण आत्ताच्या बदललेल्या जागतिक रचनेमध्ये ते शक्य नाही. भारताने अफगाणिस्तानमध्ये मोठ्या प्रमाणात म्हणजेच 22 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. आणि या गुंतवणुकीचा फायदा जर भारताला घ्यायचा असेल तर अफगाणिस्तान बरोबर संबंध ठेवणे आवश्यक आहे .भलेही राजवट कोणतीही असो.

चीनला ही अफगाणिस्तान मधील तालिबानी राजवटीचा धोका आहे. चीन मध्ये असलेल्या मुस्लिम दहशतवादाला त्यामुळे खतपाणी मिळू शकते. पण तरी ही चिनन तालिबानी राजवटीला पाठिंबा दिलेला आहे. पाकिस्तान चीन यांचे अफगाणिस्तानमध्ये मोठ्या प्रमाणात प्राबल्य असताना ही भारताला तालिबान बरोबर संबंध जोडणे आवश्यक आहे. गेल्या २० वर्षांमध्ये भारताच्या अभियांत्रिकी क्षमतेविषयी आणि वाजवी मूल्यदरांविषयी स्थानिक अफगाण जनतेमध्ये नक्कीच विश्वास निर्माण झालेला आहे. यामुळेच शेर मोहम्मद स्टानेकझाई वा तालिबानच्या इतर नेत्यांची भारताविषयीची भाषा बदललेली दिसून येते. एरवी अश्रफ घानी सरकार असताना भारतीयांकडे तालिबान संशयाने पाहात होते. आज तेच शासक बनल्यामुळे तशी परिस्थिती फार उरणार नाही..

**संदर्भसूची**

1. *http://hdr.undp.org/sites/default/files/hdr2020.pdf*
2. *हिन्दुस्तान, नई दिल्ली 10 Sep 2021*
3. *महाराष्ट्र टाइम्स.कॉम Updated: Sep 9, 2021*